# PAPER-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ____________________
   (Name) ____________________
2. (Signature) ____________________
   (Name) ____________________

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.____________________

(In words)

**D 3 8 1 1**

Time : 2 $^{1}/_{2}$ hours] [Maximum Marks : **200**

Number of Pages in this Booklet : **32** Number of Questions in this Booklet : **19**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. Answer to short answer/essay type questions are to be given in the space provided below each question or after the questions in the Test Booklet itself.

   **No Additional Sheets are to be used.**
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
4. Read instructions given inside carefully.
5. One page is attached for Rough Work at the end of the booklet before the Evaluation Sheet.
6. If you write your Name, Roll Number, Phone Number or put any mark on any part of the Answer Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
7. You have to return the test booklet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
8. **Use only Blue/Black Ball point pen.**
9. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. लघु प्रश्न तथा निबंध प्रकार के प्रश्नों के उत्तर, प्रत्येक प्रश्न के नीचे या प्रश्नों के बाद में दिये हुए रिक्त स्थान पर ही लिखिये ।
   **इसके लिए कोई अतिरिक्त कागज का उपयोग नहीं करना है ।**
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे, जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात् किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
4. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
5. उत्तर-पुस्तिका के अन्त में कच्चा काम (Rough Work) करने के लिए मूल्यांकन शीट से पहले एक पृष्ठ दिया हुआ है ।
6. यदि आप उत्तर-पुस्तिका पर नियत स्थान के अलावा अपना नाम, रोल नम्बर, फोन नम्बर या कोई भी ऐसा चिह्न जिससे आपकी पहचान हो सके, अंकित करते हैं अथवा अभद्र भाषा का प्रयोग करते हैं, या कोई अन्य अनुचित साधन का प्रयोग करते हैं, तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित किये जा सकते हैं ।
7. आपको परीक्षा समाप्त होने पर उत्तर-पुस्तिका निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और इसे परीक्षा समाप्ति के बाद अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें ।
8. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पेन का ही इस्तेमाल करें ।**
9. **किसी भी प्रकार का संगणक (केलकुलेटर) या लॉग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**

**MARATHI**
**मराठी**

**PAPER – III**
**प्रश्नपत्रिका – III**

**Note :** This paper is of **two hundred (200)** marks containing **four (4)** sections. Candidates are required to attempt the questions contained in these sections according to the detailed instructions given therein.

**टीप :** ही प्रश्नपत्रिका **दोनशे** (200) गुणांची आहे. यामध्ये **चार** (4) विभाग आहेत. प्रत्येक विभागांतर्गत दिलेल्या सूचनांना अनुसरून त्या त्या विभागातील प्रश्नांची उत्तरे द्यावीत.

## SECTION – I

## विभाग – I

**Note :** This section consists of **two** essay type questions of **twenty (20)** marks each, to be answered in about **five hundred (500)** words each. **(2 × 20 = 40 Marks)**

**टीप :** या विभागात **वीस-वीस** गुणांचे **दोन** निबंधात्मक प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सुमारे **पाचशे** (500) शब्दांत लिहिणे अपेक्षित आहे.

**(2 × 20 = 40 गुण)**

1. विद्यापीठीय स्तरावरील मराठी विषयाचा अभ्यासक्रम कसा असावा, या विषयी तुमच्या कल्पना सविस्तर मांडा.

**किंवा**

साहित्यविषयक विविध उपक्रमांसाठी शासनाच्या साहाय्यावर अवलंबून राहावे का ? या प्रश्नाची चर्चा करा.

2. मराठीतील साहित्यनिर्मिती समकालीन समस्यांशी संवादी आहे का ? सकारण मीमांसा करा.

**किंवा**

संतसाहित्याचा मराठी माणसाच्या जीवनदृष्टीवर काही परिणाम झाला आहे असे तुम्हास वाटते का ? ऊहापोह करा.

## SECTION – II

## विभाग – II

**Note :** This section contains **three (3)** questions from each of the electives/specializations. The candidate has to choose only one elective/specialization and answer all the three questions contained therein. Each question carries **fifteen (15)** marks and is to be answered in about **three hundred (300)** words. **(3 × 15 = 45 Marks)**

**टीप :** या विभागात प्रत्येक ऐच्छिक अभ्यासक्रमावर आधारित **तीन** (3) प्रश्न आहेत. उमेदवाराने कोणताही एकच ऐच्छिक विषय निवडावयाचा आहे. त्यामधील तिन्ही प्रश्न अनिवार्य आहेत. प्रत्येक प्रश्नास **पंधरा** (15) गुण असून त्याचे उत्तर सुमारे **तीनशे** (300) शब्दांत लिहिणे अपेक्षित आहे. **(3 × 15 = 45 गुण)**

### ऐच्छिक I – लोकसाहित्य

3. साहित्याच्या रूढ प्रवाहापेक्षा लोकसाहित्य कोणकोणत्या प्रकारे भिन्न असते, ते स्पष्ट करा.

4. मराठीतील लोकगीतांच्या वाङ्मयीन गुणवत्तेची चिकित्सा करा.

5. मराठीतील लोकसाहित्याच्या संशोधनाचा आढावा घ्या.

**किंवा**

### ऐच्छिक II – तौलनिक साहित्याभ्यास

3. तौलनिक साहित्याभ्यासातील तुलनेचे आधारतळ कोणते ते स्पष्ट करा.

4. राष्ट्रीय साहित्य आणि विश्वसाहित्य यांच्या कक्षा स्पष्ट करा.

5. भाषांतराच्या विविध प्रकारांचे सोदाहरण वर्णन करा.

**किंवा**

### ऐच्छिक III – स्त्रीवादी साहित्याभ्यास

3. स्त्रीवादी साहित्याभ्यासाच्या स्वरूपाचे खुलासेवार वर्णन करा.

4. स्त्रीवादाचा मराठी समीक्षेवर कोणता प्रभाव पडला आहे ? चर्चा करा.

5. १९७० नंतरच्या स्त्रियांच्या कथासाहित्याचे स्त्रीवादी समीक्षण करा.

**किंवा**

### ऐच्छिक IV – ग्रामीण साहित्य

3. ग्रामीण साहित्याची पृथगात्मता सोदाहरण स्पष्ट करा.

4. ग्रामजीवनाचे वास्तव मराठी ग्रामीण साहित्यातून कितपत प्रगट झाले आहे, त्याचा आढावा घ्या.

5. ग्रामीण साहित्याच्या भाषेचे वेगळेपण सोदाहरण विशद करा.

**किंवा**

## ऐच्छिक V – दलित साहित्य

3. ‘दलित साहित्याचे क्रांतिविज्ञान’ या बाबूराव बागूल यांच्या मतप्रकटनाविषयी चर्चा करा.

4. दलित साहित्याच्या वाटचालीतील टप्पे सांगा.

5. दलित कवितेतील प्रतिभासृष्टीचे वेगळेपण सांगून नामदेव ढसाळ यांच्या कवितेतील प्रतिमांची चर्चा करा.

## SECTION – III
## विभाग – III

**Note :** This section contains **nine (9)** questions of **ten (10)** marks each, to be answered in about **fifty (50)** words. **(9 × 10 = 90 Marks)**

**टीप** : या विभागात **दहा-दहा** (10-10) गुणांचे **नऊ** (9) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सुमारे **पन्नास** (50) शब्दांत लिहिणे अपेक्षित आहे. **(9 × 10 = 90 गुण)**

6. मराठीतील आख्यानकाव्याचे वेगळेपण स्पष्ट करा.

7. महानुभाव गद्यग्रंथांनी मराठीत कोणती मोलाची भर घातली ?

8. शाहिरी काव्याला ‘आधुनिक मराठी कवितेची प्रभात’ असे का म्हणतात ?

9. मराठी नवकथा तत्पूर्वीच्या कथेपेक्षा कोणकोणत्या प्रकारे वेगळी होती ?

10. इरावती कर्वे यांच्या ललित लेखनाने ललित गद्य या साहित्यप्रकारात एक नवे पर्व कशा प्रकारे सुरू झाले ते सांगा.

11. प्रमाणभाषा व बोली यांत कोणत्या प्रकारचे भेद असतात ?

12. काव्यानंद का होतो ते कोणत्याही एका उपपत्तीच्या आधारे स्पष्ट करा.

13. आस्वादक समीक्षा असा प्रकार मानण्यास विरोध का केला जातो ?

14. इंग्रजी राजवट आल्यानंतर तत्कालीन महाराष्ट्रीय जीवनात कोणकोणते बदल घडले ?

## SECTION – IV
## विभाग – IV

**Note :** This section contains **five (5)** questions of **five (5)** marks each based on the following passage. Each question should be answered in about **thirty (30)** words.

**(5 × 5 = 25 Marks)**

**टीप :** या विभागात खालील उताऱ्यावर आधारित **पाच** (5) प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर सुमारे **तीस** (30) शब्दांत लिहिणे अपेक्षित आहे. प्रत्येक प्रश्नास **पाच** (5) गुण आहेत.

**(5 × 5 = 25 गुण)**

साहित्यकृति-समीक्षा, साहित्यप्रकार / वर्ग-समीक्षा, सैद्धांतिक समीक्षा या तिन्ही पातळ्यांवर आपला संबंध एका बाजूने साहित्यकृतींशी येतो आणि दुसऱ्या बाजूने संकल्पना व सिद्धांत यांच्याशी येतो. हे दोन्ही संबंध सर्व पातळ्यांवर भक्कम ठेवले पाहिजेत. त्यांतला एक जरी संबंध सैल झाला तरी गोंधळ उडतो. समीक्षक आपल्या जाणता -अजाणता संस्कारित झालेल्या, ज्यात अर्धस्फुट कल्पनांचे व्यामिश्र जाळे निर्माण झालेले आहे अशा, मनाने साहित्यकृतीला सामोरा जातो आणि विश्लेषण व मूल्यमापन करू लागतो. हे कार्य जास्तीत जास्त व्यवस्थित होण्यासाठी समीक्षकाला स्वत: मध्ये असलेला संकल्पनाव्यूह स्पष्ट करावा लागतो; त्यांतील अनेक घटकांमध्ये संगती लावावी लागते; आणि हे करीत असताना एक सत्त्वतर्काभास घडणार नाही याची काळजी घ्यावी लागते. विशेषत: एखादा सिद्धांत उभा करताना या शेवटच्या बाबतीत फार जागरूक रहावे लागते. जेथे जरूर लागेल तेथे साहित्यकृतीच्या बाहेर जाऊन वेगवेगळ्या ज्ञानशाखांची मदत घ्यावी लागते. येथे एक विवेक करायला हवा. आपल्या कार्यात जरूर पडेल तेव्हाच इतर विद्याशाखांकडे जावे. त्यांचा व्यवस्थित अभ्यास करावा. आणि त्या शाखांमधून जी मदत मिळाली ती घेऊन परत आपल्या कार्याकडे वळावे. परंतु एखाद्या विद्याशाखेत काहीतरी नवे घडते आहे म्हणून ते कितीही रोमहर्षक असले, तरी ते कारण नसल्यास साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रात आणू नये. आपण भारतीय लोक परदेशी गोष्टींमुळे इतके भारावून जातो व त्यांची आयात करण्याची आपल्याला इतकी घाई असते की त्यांचे नक्की स्वरूप काय, त्यांचा आपल्याला फायदा काय, या कोणालाही सहज सुचणाऱ्या गोष्टीही आपल्याला सुचत नाहीत. येथे एक मजेदार, पण आपल्या मनोवृत्तीची द्योतक ठरेल अशी गोष्ट आठवते. गेल्या महायुद्धाच्या वेळी काठेवाडातील एका लहानशा राज्यातल्या राजाला भारत सरकारने विचारले की "तुमच्याकडे काही पंचमस्तंभी चळवळी चालू आहेत काय ?" त्यावर राजेसाहेबांनी तत्काळ उत्तर पाठविले की "अजून असे काही झालेले नाही. पण सरकारची इच्छा असल्यास ही चळवळ ताबडतोब चालू करू. त्याच्या उद्‌घाटनाला स्वत: लाटसाहेबांनाच बोलावू."

15. लेखकाने या उताऱ्यात कोणत्या पातळ्यांची आणि कोणत्या सिद्धांतांची चर्चा केली आहे ?

16. समीक्षकाला स्वत: मधील संकल्पना व्यूहाचे काय करावे लागते ?

17. इतर विद्याशाखांचा उपयोग केव्हा आणि कितपत करावा ?

18. परदेशी गोष्टींच्या बाबतीत भारतीयांची वृत्ती कशी असते ?

19. शेवटी दिलेल्या गोष्टीचे तात्पर्य काय ?

**Space For Rough Work**

**FOR OFFICE USE ONLY**

| Marks Obtained | |
|---|---|
| Question Number | Marks Obtained |
| 1 | |
| 2 | |
| 3 | |
| 4 | |
| 5 | |
| 6 | |
| 7 | |
| 8 | |
| 9 | |
| 10 | |
| 11 | |
| 12 | |
| 13 | |
| 14 | |
| 15 | |
| 16 | |
| 17 | |
| 18 | |
| 19 | |

Total Marks Obtained (in words) ..........................................

(in figures) ........................................

Signature & Name of the Coordinator ..................................

(Evaluation) Date .........................